मुंबई विद्यापीठ

दूरध्वनी नं:—०२२—२२८७३६९६
वेबसाईट :— www.nssmu.org
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
चर्चगेट, मुंबई — ४०० ०२०.
प्रत्र क्र.रासेयो/६७९/२०१५—१६
दिनांक :— २८.०९.२०१५.

प्रति,
प्राचार्य, राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सर्व महाविद्यालये,

**विषय:— 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत विशेष स्वच्छता अभियान कार्यक्रमाची रूपरेषा**

मा. महोदय/महोदया,

केंद्र शासन व राज्य शासन यांचे परिपत्रकानुसार राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत दिनांक **२५/०९/२०१५ ते ११/१०/२०१५** दरम्यान **'स्वच्छ भारत अभियान' विशेष स्वच्छता अभियान** राबविण्यात यावे असे निर्देश देण्यात आले आहेत. सदर अभियानात खालील प्रमाणे विविध उपक्रम राबविण्यात यावेत.

- दिनांक **०२ ऑक्टोंबर २०१५** रोजी राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सर्व कार्यालयामध्ये 'स्वच्छता शपथ' (Pledge) देण्यात यावी व कार्यक्रमामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, शिक्षक वर्ग, राष्ट्रीय सेवा योजनेचे हिंतचिंतक व संबधीत सर्व अधिकारी यांचा समावेश असावा. (स्वच्छता शपथ सोबत जोडली आहे.)
- **कार्यालयाची स्वच्छता** — 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमामध्ये सहभागी महाविद्यालय/संस्था यांच्या राष्ट्रीय सेवा योजना कार्यालयाची उच्च पातळीवर स्वच्छता करण्यात यावी
- राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत दोन वर्षामधील उपक्रमामध्ये नियमित कार्यक्रम अंतर्गत **२४० तास व ७ दिवसाच्या विशेष शिबिरा अंतर्गत** दत्तक गाव / वस्ती / खेडे इत्यादी अंतर्गत 'स्वच्छ भारत अभियान' राबविण्यात यावे. तसेच वृक्षारोपण करण्यात यावे.
- महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना द्वारे प्राधान्यांनी व सातत्याने **महाविद्यालयाच्या परिसराची स्वच्छता** करावी व स्वच्छते विषयी विद्यार्थ्यांचे उद्बोधन कार्यक्रम आयोजित करण्यात यावे.
- महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे दत्तक वस्ती / खेडे / शहरी व ग्रामिण वस्ती / सार्वजनिक रूग्णालय / वृध्दाश्रम /अनाथालय / रेल्वे स्थानके / बस स्थानके /ऐतिहासिक स्मारके व इत्यादी सार्वजनिक स्थळावर 'स्वच्छता अभियान' राबविण्यात यावे.
- 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत जनजागृतीसाठी **रॅली/मेळावे** यांचे आयोजन करण्यात यावे.
- 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत संबधीत विषयावर तज्ञ व्यक्तीच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात यावे तसेच, भित्ती चित्रे, घोषवाक्य, निंबध, कविता लेखन, स्तंभलेखन इत्यादी **कार्यक्रम / स्पर्धा आयोजित करण्यात यावेत**.
- **१५ ऑक्टोंबर** रोजी ''Global Handwashing Day'' व दिनांक **१९ नोव्हेंबर** रोजी ''World Toilet Day'' अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

उपरोक्त अभियान अंतर्गत महाविद्यालय पातळीवर राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित व विशेष शिबिर कार्यक्रमा अंतर्गत 'स्वच्छ भारत अभियान' संदर्भात वरील प्रमाणे विविध उपक्रम राबविण्यात यावेत. **अभियाना अंतर्गत राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा, जिल्हास्तर / विद्यापीठस्तर, स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी व महाविद्यालय यांना देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कारासाठीच्या महत्वाच्या मार्गदर्शक तत्वा मध्ये अंतर्भाव केला जाईल.**

सर्व जिल्हा समन्वयक, विभागीय समन्वयक यांना कळविण्यात येते की, आपल्या विभाग / जिल्हा अंतर्गत सर्व महाविद्यालयांना 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत उपक्रम राबविण्यास प्रोत्साहान द्यावे व **दिनांक २५/०९/२०१५ ते ११/१०/२०१५ दरम्यान 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात यावे. आयोजित केलेल्या सर्व उपक्रमाचा एकत्रित अहवाल दिनांक १५ ऑक्टोंबर २०१५ पर्यत विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावा. हि विंनती.**

कळावे

आपला विश्वासू,

प्रा. बाबासाहेब स. बिडवे
कार्यक्रम समन्वयक. रा.से.योजना विभाग

प्रत: १. रिजनल डायरेक्टर, राष्ट्रीय सेवा योजना रिजनल डायरेक्टोरेट, पुणे
२. राज्य संपर्क अधिकारी, रा.से.यो., मंत्रालय कक्ष, महाराष्ट्र शासन

# स्वच्छता शपथ

महात्मा गांधी ने जिस भारत का सपना देखा था उसमें सिर्फ राजनैतिक आजादी ही नहीं थी, बल्कि एक स्वच्छ एवं विकसित देश की कल्पना भी थी।

महात्मा गांधी ने गुलामी की जंजीरों को तोडकर माँ भारती को आजाद कराया।

अब हमारा कर्तव्य है कि गंदगी को दूर करके भारत माता की सेवा करें।

मैं शपथ लेता हूं कि मैं स्वयं स्वच्छता के प्रति सजग रहूंगा और उसके लिए समय दूंगा।

हर वर्ष १०० घंटे यानी हर सप्ताह २ घंटे श्रमदान करके स्वच्छता के इस संकल्प को चरितार्थ करूंगा।

मैं न गंदगी करूंगा न किसी और को करने दूंगा।

सबसे पहले मैं स्वयं से, मेरे परिवार से, मेरे मुहल्ले से, मेरे गांव से एवं मेरे कार्यस्थल से शुरूआत करूंगा।

मैं यह मानता हूं कि दुनिया के जो भी देश स्वच्छ दिखते हैं उसका कारण यह है कि वहां के नागरिक गंदगी नही करते और न ही होने देते हैं।

इस विचार के साथ मैं गांव—गांव और गली—गली स्वच्छ भारत मिशन का प्रचार करूंगा।

मैं आज जो शपथ ले रहा हूं, वह अन्य १०० व्यक्तियों से भी करवाऊंगा।

वे भी मेरी तरह स्वच्छता के लिए १०० घंटे दें, इसके लिए प्रयास करूंगा।

मुझे मालूम है कि स्वच्छता की तरफ बढाया गया मेरा एक कदम पूरे भारत देश को स्वच्छ बनाने में मदद करेगा।

***